"ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिला सक्षमीकरणात सुक्ष्म वित्तपुरवठ्याची भूमिका : एक अर्थशास्त्रीय अभ्यास"
(विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्य विद्याशाखा अंतर्गत 'अर्थशास्त्र' या विषयातील पीएच्. डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करण्यात आलेला शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा

*** संशोधक ***

घंटेवाड आनंद तुकाराम

पीपल्स महाविद्यालय, नांदेड

*** मार्गदर्शक ***

प्रा. डॉ. कंधारे विश्वनाथ गोविंद

अर्थशास्त्र विभागप्रमुख,

धुंडा महाराज कॉलेज, देगलूर

* संशोधन केंद्र *

पीपल्स महाविद्यालय, नांदेड.

सप्टेंबर २०२२

"ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिला सक्षमीकरणात सुक्ष्म वित्तपुरवठ्याची भूमिका : एक अर्थशास्त्रीय अभ्यास" (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)

प्रस्तावना :-

प्रस्तुत संशोधनाचा विषय "ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिलांच्या सक्षमीकरणात वित्त पुरवठ्याची भूमिका एक अर्थशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा " हा आहे. या विषयाचा अभ्यास करण्यासाठी ग्रामीण समाजातील कृषी, अर्थव्यवस्था, लघु उद्योग, कुटिर उद्योग आणि ग्रामीण दारिद्र्य यावर प्रकाश टाकणे महत्त्वाचे आहे. भारताने स्वातंत्र्योत्तर काळात मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. भारताची विभागणी विकसित आणि अविकसित प्रदेशात झाली. देशात दारिद्र्य, बेरोजगारी, आर्थिक विषमता निर्माण होणार नाही, याची काळजी घेण्यात आली. परंतु भांडवलशाही आणि मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये साधनसामग्रीचा मालकी हक्क मान्य केल्याने विकास प्रक्रियेत दारिद्र्य, बेरोजगारी आणि आर्थिक विषमता इत्यादी समस्या विकसित व अविकसनशील देशात निर्माण झाल्या आहेत.[1] ग्रामीण भागात कृषीला महत्त्व आहे. भारताचा आर्थिक विकास कृषीवर आधारित आहे. भारताचा आर्थिक वृद्धीदर वाढवायचा असेल तर ग्रामीण समाजातील उद्योग, सेवा, व्यापार, शेती याबरोबरच दारिद्र्य निर्मुलन करणे आवश्यक आहे. भारतात ग्रामीण भागात खेड्यांची संख्या जास्त असल्यामुळे दारिद्र्याची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. देशाच्या विकासात दारिद्र्य अडथळा ठरत आहे.

दारिद्र्य निर्मुलनासाठी आर्थिक वृद्धीदरात वाढ करण्याच्या दृष्टिकोनाबरोबरच प्रत्यक्ष दारिद्र्य निर्मुलनाच्या कार्यक्रमावर भर देण्यात आला. अनेक पंचवार्षिक योजनांचे मुख्य उद्दिष्ट दारिद्र्य निर्मुलन राहिले आहे.[2] दारिद्र्य निर्मुलन करणाऱ्या अनेक योजनांपैकी 'स्वयंसहायता बचत गट' ही एक प्रभावी योजना ठरली आहे. अनेक महिला स्वेच्छेने एकत्र येऊन बचत गटाची स्थापना करतात. १९७० च्या दशकात बांगलादेशात डॉ. महम्मद युनुस यांनी सुरू केली. ही योजना देशातील बँकीग

क्षेत्राशी संलग्न असलेली योजना आहे. आज ही योजना 'मायक्रो फायनान्स प्रोग्राम' म्हणून संपूर्ण देशात पसरली आहे. ही योजना 'मायक्रो क्रेडीट स्कीम' म्हणून यशस्वी झाली आहे. बांगलादेशातील 'मायक्रो क्रेडिट स्कीम'च्या धर्तीवर भारतात 'मायक्रो फायनान्स प्रोग्राम' सुरु करण्यात आला. १९७० च्या दशकानंतर भारतात बँकांचा प्रचंड विकास आणि विस्तार झाला. बँका आर्थिक व्यवहार करताना काही तत्त्वांचे पालन करतात. या कर्जदारांना तारण्याच्या आधाराने कर्ज देतात. परंतु असंख्य गरीब दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील व्यक्तीकडे तारण देण्यासारखे काहीही नसते. म्हणून बँका त्यांना कर्ज देण्यास असमर्थता दर्शवतात. यावर रामबाण उपाय म्हणून 'स्वंयसहायता बचत गट' योजना प्रेरणादायी ठरली आहे.[3] बचत गटाप्रमाणेच ग्रामीण भागातील विविध महिला एकत्रित येत असतात. त्यांचा समुह तयार करतात. या दारिद्र्य रेषेखालील महिलांच्या समुहांना वित्त पुरवठा करणाऱ्या संस्था कर्ज देत आहेत. या कर्जाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांचे सक्षमीकरण होत आहे. या अनुषंगाने अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड केलेली आहे.

दारिद्र्य संकल्पना :-

भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धीदर वाढविण्यासाठी अनेक प्रयत्न चालू आहेत. विशेषतः भारतीय अर्थव्यवस्थेपुढे अनेक आर्थिक समस्या आहेत. त्यापैकी ग्रामीण भागातील दारिद्र्य ही एक मूलभूत व प्रमुख समस्या आहे. भारतातील लोकसंख्येचा वाढता दर, वाढती बेरोजगारी यामुळे दारिद्र्याची समस्या निर्माण झाली. दादाभाई नौरोजी यांनी १८७६ मध्ये सर्व प्रथम भारतातील दारिद्र्यावर ग्रंथ लिहिलेला आहे. तो म्हणजे, "भारतीय दारिद्र्याची समस्या व कारणमीमांसा" ग्रंथात दारिद्र्यावर प्रकाश टाकला आहे. त्यानंतर विविध अर्थशास्त्रज्ञांनी दारिद्र्याचा अभ्यास केला. त्यामध्ये प्रामुख्याने पी. डी. ओझा, डॉ. दांडेकर व निळकंठ रथ, बी. एस. मिन्हास, मॉंटी अहलुवालिया, गौरव दत्त, प्रणव वर्धन, एस.आर.जैन आणि एस.डी. तेंडुलकर इत्यादी अर्थशास्त्रज्ञांचा नामोल्लेख करावा

लागतो. प्रारंभीपासून भारतात दारिद्र्याची समस्या कायम आहे. आजपर्यंत दारिद्र्याचे निर्मुलन करण्यासाठी विविध योजनांची निर्मिती केली. परिणामी दारिद्र्य निर्मुलन होऊ शकले नाही. स्वातंत्र्यपूर्व दारिद्र्य हे ब्रिटिशांच्या वसाहतवाद धोरणाचा परिणाम होता. स्वातंत्र्योत्तर काळात सदोष नियोजन, दारिद्र्य निर्मुलनासाठी आवश्यक असलेल्या इच्छाशक्तींचा अभाव, उत्पन्नातील विषमता तसेच योग्य रोजगार धोरणांचा अभाव होय. [4]

ब्रिटिश कालावधीत भारतातील छोटे छोटे लघुउद्योग व कुटिरोद्योग बंद पडले व यंत्रावर आधारित मोठमोठ्या कारखान्यांची निर्मिती झाली. परिणामी ग्रामीण भागात बेरोजगारी वाढीला चालना मिळाली. किंबहुना दारिद्र्यात प्रचंड प्रमाणात वृद्धि होत गेली. दारिद्र्याचे स्वरूप आर्थिक घटकांवर अवलंबून आहे. त्याकरिता दरिद्री लोकांचे प्रमाण वाढत आहे. परिणामी, सामाजिक स्वास्थ्य, आरोग्य, शांतता व सुव्यवस्था आणि आर्थिक विकास व वृद्धी धोक्यात आली आहे. यासंदर्भात गुन्नार मिडल, वि. म. दांडेकर यांनी दारिद्र्य ही मानवी समस्या आहे त्यामुळे मानवतावादी भूमिकेतून विवेचन केले. या संदर्भात प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ ॲडम स्मिथ म्हणतात की, "माणसे गरीब किंवा श्रीमंत" यामुळे असतात की, त्यांना त्यांच्या आवश्यक गरजा, करमणुकीची साधने मिळविता येत नाहीत. [5]

दारिद्र्य दोन पद्धतीने मोजता येते. विशिष्ट निर्देशांक मोजून तथा प्रत्यक्ष शिरगणती करून भारतात विविध दारिद्र्यविषयक धोरण ठरविण्यासाठी शिरगणतीचे प्रमाण विचारात घेतात. दारिद्र्यविषयक धोरण नियोजन आयोग ठरविते. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी ग्रामीण भागात ग्रामीण मंत्रालय व शहरी भागात आवास व शहरी दारिद्र्य निर्मुलन मंत्रालय करत असते. त्यामुळे नियोजन आयोग दारिद्र्य प्रमाण ठरवत असते. दोन्ही मंत्रालय दारिद्र्याचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करीत असतात.'[6] विविध अर्थतज्ज्ञांनी, समित्यांनी, नियोजन आयोगाने व दोन्ही मंत्रालयांनी ही शिरगणती केली व त्यावरून दारिद्र्याचे प्रमाण कसे हे मोजले. पी. डी. ओझा यांनी सरासरी २२५० कॅलरी प्रतिदिन हा निकष वापरून दारिद्र्याचे प्रमाण मोजले आहे. दांडेकर व रथ यांनी देखील २२५०

कॅलरी प्रतिदिन हाच निकष वापरला. बी. एस. मिन्हास यांनी ग्रामीण दारिद्र्य मोजण्यासाठी २४०/- रूपये वार्षिक खर्चाचे पातळी वापरून मोजणी केली. माँटेकसिंग अहलुवालिया यांनी ग्रामीण भागासाठी १५/- रूपये व शहरी भागासाठी २०/- रूपये मासिक दरडोई खर्चाची पातळी वापरली आहे. नियोजन आयोगाने कृती दलाच्या सल्ल्याने ग्रामीण भागात २४०० कॅलरी व शहरी भागात २१०० कॅलरी हा निकष ठरविला आहे. [7]

एकूण गरीब किंवा दरिद्री कोणास म्हणावे? गरीब ठरविण्याचा निकष किंवा आधार काय असावा हे ठरविण्याचा प्रयत्न मिन्हास, वर्धन, दांडेकर व रथ इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी केलेला आहे. दारिद्र्यामध्ये पुढील वर्गातील लोकांचा अंतर्भाव केला आहे.

(१) भूमिहीन शेतमजूर

(२) अल्प आणि सीमांत भूधारक

(३) ग्रामीण भागातील असे श्रमिक की जे शेतमजुरी करतात. त्यांच्याकडे शेतजमीन नसते.

(४) ग्रामीण कारागीर ज्यांचे परंपरागत व्यवसाय बंद झाले आहेत.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर दारिद्र्य रेषा ठरविताना फक्त आहाराचाच विचार केला जातो. पण जीवनमान जगण्यासाठी अन्नाबरोबरच वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण यांचीही गरज असते. या वरील खर्चाचाही दारिद्र्य रेषा ठरविताना विचार होणे गरजेचे आहे. दारिद्र्याची व्याख्या जागतिक बँकेने केलेली आहे. "दारिद्र्य म्हणजे निवारा नसणे, आजारी असणे आणि उपचार घेऊ न शकणे, निरक्षर असणे आणि शाळेत जाऊ न शकणे, बेरोजगार असणे, भविष्याचे भय असणे, प्यायला शुद्ध पाणी नसणे. दारिद्र्य म्हणजे स्वातंत्र्याचा अभाव." तसेच ज्यावेळी एखाद्या व्यक्तीला आपल्या किमान मूलभूत गरजा पूर्ण करता येत नाहीत अशी जी अवस्था असते त्या अवस्थेला दारिद्र्य असे म्हणतात. [8]

सुक्ष्म वित्त पुरवठा म्हणजे काय ?

दारिद्र्य रेषेखालील महिलांना आर्थिक कर्ज व्याजाच्या स्वरूपात देणाऱ्या सुक्ष्म वित्त पुरवठा संस्था कोणत्या आहेत, सुक्ष्म वित्त पुरवठा संस्था म्हणजे काय? यावर प्रकाश टाकणे महत्त्वाचे आहे. सुक्ष्म वित्त पुरवठा म्हणजे गरीब महिलांना शाश्वत पद्धतीने आर्थिक सेवा पुरवणे होय. कुटुंबांना उत्पन्न मिळवून देणाऱ्या क्रियाकलापांचा लाभ घेण्यासाठी आणि जोखमीचा चांगल्याप्रकारे सामना करण्यास मदत करण्यासाठी क्रेडीट, बचत आणि सुक्ष्म विमा यासारख्या इतर उत्पादनाचा वापर करते. महिलांना विशेषतः सुक्ष्म वित्त पुरवठ्याचा फायदा होतो. कारण, अनेक सुक्ष्म वित्तपुरवठा करणाऱ्या संस्था महिला ग्राहकांना लक्ष्य करतात आणि त्यांना कर्ज देतात. त्यांनाच "सुक्ष्म वित्त पुरवठा संस्था" असे म्हणतात. [९]

महिला आणि सुक्ष्म वित्त पुरवठा

जगातील ७०% गरीब महिला आहेत. तरीही पारंपरिकपणे महिलांना कर्ज आणि इतर आर्थिक सेवांमध्ये प्रवेश देण्यात गैरलागू आहे. व्यावसायिक बँका अनेकदा पुरुष आणि औपचारिक व्यवसायावर लक्ष केंद्रित करतात. अनौपचारिक अर्थव्यवस्थेचा मोठा आणि वाढणारा भाग बनवणाऱ्या महिलांना दुर्लक्षित करतात. सुक्ष्म वित्त पुरवठ्याच्या माध्यमातून महिला कर्जदारांना लक्ष्य करणे सार्वजनिक धोरणाच्या दृष्टिकोनातून अर्थपूर्ण आहे. त्यामुळे सुक्ष्म वित्तपुरवठा सेवा महिलांच्या निर्णयक्षमतेवर सकारात्मक प्रभाव टाकून त्यांची एकूण सामाजिक, आर्थिक स्थितीला गती देऊन महिला सक्षमीकरणाकडे वाटचाल करत आहेत. २००६ च्या अखेरीस सुक्ष्म वित्तपुरवठा सेवा जगातील सर्वात गरीब महिलांपैकी ७९ दशलक्षापेक्षा जास्त महिलांपर्यंत पोहोचल्या आहेत. अशाप्रकारे सुक्ष्म वित्तामध्ये आर्थिक समानतेसाठी महत्त्वपूर्ण योगदान देण्याची आणि शाश्वत उपजीविका आणि महिलांसाठी चांगल्या कामाच्या परिस्थितीला प्रोत्साहन देण्याची क्षमता आहे. [१०]

महिला सक्षमीकरणात वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांची भूमिका

सुक्ष्म वित्त पुरवठा कार्यक्रम केवळ महिला आणि पुरुषांना बचत आणि क्रेडिटमध्ये प्रवेश देत नाहीत तर जगभरातील लाखो लोकांपर्यंत पोहोचली आहे. महिलांना संघटित गटांमध्ये नियमितपणे एकत्र आणतात. लैंगिक समानता आणि महिला सक्षमीकरण व गरीब समर्थक विकास आणि ग्रामीण समाजाच्या बळकटीकरणासाठी एक अतिशय महत्त्वपूर्ण योगदान आहे. उत्पन्न मिळविण्याच्या महिलांच्या क्षमतेमध्ये त्यांच्या योगदानामुळे या कार्यक्रमामध्ये आर्थिक सक्षमीकरण महिला आणि त्याच्या कुटुंबाचे कल्याण आणि व्यापक सामाजिक आणि राजकीय सशक्तीकरणाची सद्गुणी आवर्त मालिका सुरू करण्याची क्षमता आहे. सुक्ष्म वित्तसेवा आणि पुरुषांचा समावेश असलेल्या गटामध्ये लैंगिक समानता साध्य करण्यासाठी आवश्यक घटक म्हणून पुरुषांच्या वृत्ती आणि वर्तनावर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचे आणि लक्षणीय बदल करण्याची क्षमता आहे. बहुसंख्य सुक्ष्म वित्तपुरवठा कार्यक्रम महिला सक्षम करण्याच्या उद्देशाने केंद्रित करतात. महिला सक्षमीकरणाचा पाठपुरावा करण्यासाठी विविध अंतर्निहित प्रेरणा आहेत. काही लोकांचा असा युक्तिवाद आहे की, स्त्रिया सर्वात गरीब आहेत. वंचितामध्ये सर्वात असुरक्षित आहेत. अशाप्रकारे त्यांना मदत करणे हे प्राधान्य असले पाहिजे. अधिक स्त्रीवादी दृष्टिकोनावर भर दिल्या जातो. वित्तीय सेवांमध्ये वाढीव प्रवेश अधिक सक्षमीकरणाची संधी दर्शवते अशा संस्था स्पष्टपणे सुक्ष्म वित्त हे महिलांच्या हक्क आणि स्वातंत्र्याच्या लढ्यात एक साधन मानतात. शेवटी आर्थिक व्यवहारतेच्या उद्दिष्टाला अनुसरून वाढत्या संख्येने सुक्ष्म वित्तपुरवठा संस्था महिला सदस्यांना प्राधान्य देतात कारण त्यांना विश्वास आहे की, ते अधिक चांगले आणि अधिक विश्वासार्ह्य कर्जदार आहेत. अशा कर्ज घेणाऱ्या महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होण्यास गती प्राप्त होत आहे. [12]

संशोधन विषयाचे महत्त्व :-

ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. त्यामुळे बहुसंख्य महिला शेतीत शेतमजुरी करतात. त्यांना मजुरी दर अल्प दिल्या जातो. अशा महिला दारिद्र्य रेषेखालील जीवन

जगत आहेत. स्वातंत्र्योत्तर भारतात विविध पंचवार्षिक योजनांची आखणी केली. पंचवार्षिक योजनांमध्ये ग्रामीण विकास, ग्रामीण लोकांचा आर्थिक विकास, दारिद्र्य निर्मुलनाच्या विविध योजनांची निर्मिती केली. शासनाने देखील महिला विकास व सक्षमीकरणासाठी विविध कार्यक्रम राबविले आहेत. महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय महिला आयोग, राज्य महिला आयोग आणि राष्ट्रीय सक्षमीकरणासाठीचे राष्ट्रीय धोरण यांची देखील भूमिका महत्त्वाची ठरत आहे. त्याचप्रमाणे दारिद्र्य रेषेखालील महिलांना शासकीय व निमशासकीय बँका कर्ज देत आहेत. त्याचप्रमाणे सुक्ष्म वित्तपुरवठा संस्था ग्रामीण भागात कर्ज वाटप करत आहेत. ग्रामीण महिलांना कमी व्याज दरात कर्ज दिल्यामुळे विविध गृहउद्योग चालू केले आहेत. प्रस्तुत संशोधन विषयाचे महत्त्व खालीलप्रमाणे नमूद करता येईल.

1) दारिद्र्य रेषेखालील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होत आहे, या दृष्टिने महत्त्व अधोरेखित करता येईल.
2) दारिद्र्य रेषेखालील महिलांना सुक्ष्म वित्तपुरवठा संस्था कमी व्याजदराने कर्ज देत आहेत. त्यामुळे त्यांच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण होत आहेत. तसेच त्यांनी विविध गृहउद्योग चालू केले आहेत, या अनुषंगाने महत्त्व नमूद करता येईल.
3) ग्रामीण भागातील महिलांना सुक्ष्म वित्त पुरवठा करणाऱ्या संस्था कर्ज वाटप करत असल्यामुळे महिला सक्षमीकरणाला गती प्राप्त होत आहे. या दृष्टिने महत्त्व सांगता येईल.
4) सुक्ष्म वित्त पुरवठा संस्था ग्रामीण महिलांना कर्ज देत असल्यामुळे ग्रामीण भागातील महिला शहरातील बाजारपेठेत येऊन वस्तु खरेदी करत आहेत. त्यांना बाजारपेठ, वस्तुनिर्मिती, उत्पादन प्रक्रिया, उत्पादन वितरण या बाबींची माहिती होत आहे. या दृष्टिने देखील महत्त्व स्पष्ट करता येईल.
5) ग्रामीण भागातील महिला कर्ज घेऊन मुलांचे शिक्षण, व्यवसाय, मुलींचे विवाह आणि सावकारांचे कर्ज फेडत आहेत. या दृष्टिने देखील महत्त्व सांगता येईल.

संशोधन विषयाची निवड :

भारतात दारिद्र्य ही संकल्पना सार्वत्रिक स्वरूपाची आहे. दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या वरचेवर वाढत आहे. या बाबीचा विचार करून विविध अर्थशास्त्रज्ञांनी दारिद्र्याचे निकष ठरविले आहेत. प्रामुख्याने ग्रामीण भारतात दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची संख्या वेगाने वाढत आहे. अशा लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत. परिणामी इतर लोकांकडून व्याजाने पैसे घेऊन जीवनचरितार्थ चालवित असतात. तरीही जीवनातील मूलभूत भौतिक सुविधा आजपर्यंत त्यांना मिळालेल्या नाहीत. त्यांचे जीवन आर्थिक घटकांपासून वंचित ठरत आहे. १९९० च्या दशकात भारताने 'नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. गेल्या ३० वर्षात भारताच्या विविध क्षेत्रात लक्षणीय बदल झालेले आहेत. अनेक खाजगी बँकांची संख्या वाढली आहे. शासकीय व खाजगी बँका देखील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना कर्ज देत नाहीत. २०१० च्या नंतर विविध सुक्ष्म वित्तपुरवठा संस्थांची निर्मिती झाली. या संस्था ग्रामीण भागापर्यंत पोहोचल्या आहेत. ग्रामीण भागातील महिलांना अल्प व्याजदरात कर्ज देत आहेत. ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिला एकत्रित येऊन गटाच्या माध्यमातून कर्ज घेत आहेत. मिळालेल्या पैशाने विविध व्यवसाय चालु केले आहेत. अशा विविध महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत. या बाबीचा विचार करून संशोधनकर्त्यांने "ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिलांच्या सक्षमीकरणात सुक्ष्म वित्तपुरवठ्याची भूमिका : एक अर्थशास्त्रीय अभ्यास" या विषयाची संशोधन करण्यासाठी निवड केलेली आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

"ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिलांच्या सक्षमीकरणात सुक्ष्म वित्तपुरवठ्याची भूमिका : एक अर्थशास्त्रीय अभ्यास" प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी विषयाची काही निश्चित उद्दिष्ट्ये केली आहेत. खालील उद्दिष्टांना अनुसरून हा अभ्यास करण्यात येणार आहे.

१. ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिलांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील वाढत्या लोकसंख्येच्या कारणांचा व परिणामांचा अभ्यास करणे.

३. ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिलांच्या सक्षमीकरणात सुक्ष्म वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांचा अभ्यास करणे.

४. ग्रामीण भागात वाढत्या सुक्ष्म वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांच्या कार्यप्रणालीचा, व्याजदर निश्चितीचा अभ्यास करणे.

५. ग्रामीण भागातील महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात आलेल्या विविध आर्थिक योजनांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके:

१. ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिलांची आर्थिक स्थिती दुय्यम आहे.

२. ग्रामीण भागात दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येची वृद्धि होत आहे.

३. ग्रामीण भागात दारिद्र्य रेषेखालील महिलांच्या सक्षमीकरणात सुक्ष्म वित्त पुरवठा संस्था महत्त्वाच्या ठरत आहेत.

४. ग्रामीण भागात सुक्ष्म वित्त पुरवठा करणाऱ्या संस्था वाढत आहेत.

५. ग्रामीण भागातील महिला सक्षमीकरणासाठी शासन विविध आर्थिक योजना राबवित आहे.

संशोधनाचे क्षेत्र :

अर्थशास्त्र विषयामध्ये अध्ययन करताना संशोधकाने विषयाची निवड केली. विषयाची निवड केल्यानंतर अध्ययन क्षेत्र निश्चित करावे लागते. या बाबीचा विचार करून अध्ययन क्षेत्राची निवड केली आहे. महाराष्ट्र राज्याचे विभाजन मुख्य चार भागात केले आहे. यामध्ये मराठवाड्याचा समावेश आहे. मराठवाड्यामध्ये आठ जिल्ह्यांचा अंतर्भाव केला आहे. यामध्ये नांदेड जिल्हा मुख्य

आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये सोळा तालुक्यांचा समावेश आहे. १२ या सोळा तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील महिलांचे सक्षमीकरण या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी नांदेड जिल्हा निवडलेला आहे.

संशोधनाची मर्यादा :

१. प्रस्तुत अध्ययन हे मराठवाड्यातील व प्रगत नांदेड जिल्ह्यापूरते मर्यादित आहे. सदरील जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील महिलांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

२. संशोधनात ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिलांचे सक्षमीकरण करण्यास कोणते घटक जबाबदार आहेत यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. ही संशोधनाची मर्यादा सांगता येईल.

३. या संशोधनात फक्त ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिलांचाच अभ्यास केला जाणार आहे, ही एक संशोधनाची मर्यादा ठरेल.

संशोधनाचा आराखडा :

संशोधन आराखड्याशिवाय वस्तुनिष्ठ अर्थशास्त्रीय संशोधन करणे अशक्य आहे. संशोधनकर्त्याला कशाप्रकारे संशोधन करावयाचे आहे, नमूना किती घ्यायचा आहे, तथ्य कशी संकलित केली जाणार आहेत इत्यादी बाबतचे निर्णय संशोधन आराखड्यात नमूद करावे लागतात. त्याकरिता संशोधन आराखड्याची आवश्यकता असते. प्रस्तुत विषयाचे अध्ययन करण्यासाठी संशोधन आराखडा निश्चित केला आहे. 'वर्णनात्मक संशोधन आराखड्या'चा अवलंब करून अध्ययन करण्यात येणार आहे. संशोधन विषयाची निश्चित केलेली उद्दिष्ट्ये लक्षात घेऊन आराखडा विकसित केला आहे. अशाप्रकारे वैज्ञानिक पद्धतीने संकलित केलेल्या तथ्यांच्या आधारे वर्णनात्मक विश्लेषण म्हणजे वर्णनात्मक संशोधन आराखडा होय. वर्णनात्मक संशोधन आराखड्यात मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षण इत्यादी तथ्य संकलन तंत्राचा समावेश केलेला आहे. [१३]

नमूना निवड :

प्रस्तुत विषयाचा संशोधन आराखडा निश्चित केल्यानंतर संशोधक वस्तुनिष्ट तथ्ये संकलित करतो. तथ्ये संकलित करण्याच्या मुख्य दोन पद्धती आहेत. 'जनगणना पद्धती' आणि 'नमूना निवड पद्धती'. प्रस्तुत विषयाचे अध्ययन करण्यासाठी नमूना निवड पद्धतीचा अवलंब केलेला आहे. ज्यावेळी संशोधन विश्वातील किंवा समग्रातील एककांची संख्या अधिक असते त्यावेळी त्या समग्रातील एककांचा एक छोटासा नमूना गट निवडला जातो आणि त्यात नमूना गटातील समस्येशी संबंधित निष्कर्ष काढल्या जातात. अशाप्रकारे समूहाबाबत नमूना गटाच्या अभ्यासाद्वारे तथ्य संकलित करण्याच्या पद्धतीला नमूना निवड पद्धती असे म्हणतात.

सदरील पद्धतीत संपूर्ण समग्राचा अभ्यास केला जात नाही तर समग्रातून निवडलेल्या काही एककांच्या सखोल अभ्यासातून निष्कर्ष काढून ते निष्कर्ष संपूर्ण समग्राला लागू करता येतात. या पद्धतीचा फायदा वेळेची व पैशांची बचत करण्यासाठी सुलभ प्रशासन करून अभ्यास विषयाचे सखोल अध्ययन करण्यासाठी होतो. 'फ्रांक वॉटन' याच्या मते, "नमूना शब्दाचा उपयोग केवळ कोणत्याही समग्राच्या एककास किंवा एका भागाकरिता केला पाहिजे. ज्या भागास या विश्वाने निवडले असते की तो समग्राचे प्रतिनिधीत्त्व करील." 'गुड आणि हॅट' म्हटल्याप्रमाणे "नमूना त्यातील नावाप्रमाणेच एक विस्तृत समूहाचा लघु प्रतिनिधी आहे." [१४]

नमूना निवड करण्याच्या प्रचलित दोन पद्धती आहेत. 'संभाव्यता' आणि 'गैरसंभाव्यता' नमूना निवड. संशोधकाने सदरील विषयाच्या अध्ययनाकरिता गैर संभाव्यता नमूना निवड पद्धतीचा अवलंब केला आहे. गैरसंभाव्यता नमूना निवड पद्धतीमध्ये देखील विविध प्रकार आहेत. या पद्धतीमधील 'कोटा पद्धती'चा (Quota Methods) अवलंब करून अध्ययन करण्यात आलेले आहे. कोटा पद्धती समुहाचे काही गटात अथवा वर्गात विभाजन केले जाते. प्रत्येक गटातून किती एकक निवडायचे हे निश्चित केले जाते. निवडण्यात आलेले एकक नमूना म्हणून स्वीकारले जातात.[१५] कोटापद्धती अंतर्गत ३२० लाभार्थ्यांचा कोटा निश्चित केला आहे. कोटा पद्धतीचा अवलंब करण्याचे महत्त्वाचे कारण असे नमूद करता येईल की, नांदेड जिल्हा आकाराने विस्तीर्ण आहे. प्रस्तुत जिल्ह्यात एकूण १६ तालुक्यांचा अंतर्भाव आहे. प्रत्येक तालुक्यातून २० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली

आहे. उत्तरदाते निवडण्यासाठी 'स्नो बॉल' पद्धतीचा अवलंब केलेला आहे. कारण, दारिद्र्य रेषेखालील महिलांची यादी विस्तृत आहे. त्याकरिता गावामध्ये विविध महिला कर्ज घेत आहेत. त्यांच्या माध्यमातून अन्य लाभार्थी महिलांचा शोध घेता आला. साधारणतः प्रत्येक तालुक्यातील ४ गावांची निवड केली. निवडलेल्या प्रत्येक गावातून ५ लाभार्थी महिलांची नमूना म्हणून निवड केलेली आहे. एकूण नमूना ३२० निश्चित करून लाभार्थी महिलांचे कोटा पद्धतीद्वारे अध्ययन करण्यात आलेले आहे.

कोटा पद्धतीद्वारे निवडलेला नमूना निवड

घटक	नमूना
नांदेड जिल्ह्यातून एकूण नमूना निवड	320
एकूण तालुके	16
प्रत्येक तालुक्यातून नमूना निवड	20
प्रत्येक तालुक्यातील गावांची निवड	4
प्रत्येक गावातून कर्ज घेतलेल्या महिलांची निवड	5

उपरोक्त पद्धतीचा अवलंब करून एकूण ३२० नमूना निश्चित करून अध्ययन करण्यात आलेले आहे.

तथ्य संकलन :

"ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिलांच्या सक्षमीकरणात सुक्ष्म वित्तपुरवठ्याची भूमिका : एक अर्थशास्त्रीय अभ्यास" या विषयाचे अध्ययन करताना तथ्य संकलित करावी लागतात. तथ्य संकलनाच्या प्रमुख दोन पद्धती आहेत. प्राथमिक तथ्य संकलन व द्वितीय तथ्य संकलन.

अ) प्राथमिक स्रोत :

संशोधक स्वतः अध्ययन क्षेत्रात जाऊन विषयाच्या संदर्भात जीवंत व्यक्तीकडून मुलाखत अनुसूचीचा अवलंब करून माहिती संकलित करतो. त्यास प्राथमिक तथ्य संकलन असे म्हणतात. [१६]

प्राथमिक तथ्य संशोधकर्ती स्वतः संकलित करणार आहे. प्रस्तुत संशोधनासाठी ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील सुक्ष्म वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांकडून कर्ज घेतलेल्या महिलांची निवड करण्यात आली आहे. ३२० महिलांची सामाजिक, आर्थिक, व्यावसायिक आणि शैक्षणिक परिस्थिती जाणून घेण्यासाठी मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात येणार आहे.

ब) दुय्यम स्रोत :

सामाजिक संशोधनात तथ्य संकलनाचा महत्त्वपूर्ण मार्ग दुय्यम स्रोत आहे. यामध्ये प्रकाशित आणि अप्रकाशित अशा संपूर्ण लिखित माहितीचा समावेश होतो. दुय्यम स्रोतामधून मिळालेली माहिती, आकडेवारी संशोधनाला वस्तूनिष्ठ बनवण्यासाठी उपयोगाची ठरते. प्रस्तुत विषयाच्या संदर्भात प्राथमिक व सुक्ष्म स्वरूपाची माहिती दुय्यम स्रोतांद्वारे मिळत असल्याने त्या विषयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी तयार करता येते. संशोधक प्रत्यक्ष अध्ययन क्षेत्रात जाऊन माहिती संकलित करीत नसून विषयाशी संबंधित माहिती ग्रंथालय, संदर्भग्रंथ, सांख्यिकीय माहिती, अहवाल, आंतरराष्ट्रीय अहवाल याद्वारे संकलित करतो, अशा माहितीचा समावेश दुय्यम स्रोतात होतो. [17]

संकलित तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन :-

संशोधक प्राथमिक तंत्रांचा अवलंब करून तथ्य संकलित करीत असतो. संकलित तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन करणे महत्त्वाचे आहे. संकलित तथ्यांचे जोपर्यंत विश्लेषण आणि निर्वचन करीत नाही तोपर्यंत ती तथ्ये अर्थहीन ठरत असतात. त्यामुळे विश्लेषण आणि निर्वचन केल्यानंतर तथ्यांना सैद्धांतिक अर्थ प्राप्त होतो.[१८] ही बाब लक्षात घेऊन संकलित केलेल्या तथ्यांवर प्रक्रिया केली जाते. प्रकियेच्यानंतर संकलित तथ्यांचे विश्लेषण व निर्वाचन केले जाणार आहे. तथ्य प्रक्रियेमध्ये सारणीकरण, सांकेतिकीकरण करण्यात येणार आहे.

निष्कर्ष आणि सूचना :-

तथ्यांचे विश्लेषण सारणीच्या माध्यमातून करण्यात आलेले आहे. तथ्यांच्या विश्लेषणातून काही प्रमुख निष्कर्ष काढण्यात येणार आहेत. निष्कर्षांचा अभ्यास करून शिफारशी किंवा सूचना देण्यात येणार आहेत.

प्रकरणांची रूपरेषा :

1. प्रकरण पहिले : प्रस्तावना
2. दुसरे : संदर्भ साहित्याचा आढावा
3. प्रकरण तिसरे : संशोधन पद्धती
4. प्रकरण चौथे : तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन
5. प्रकरण पाचवे : संशोधन निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भग्रंथसूची :-

१. चव्हाण एन.एल. (२००९), "भारतीय अर्थव्यवस्था", जळगाव, प्रशांत पब्लिकेशन्स. प्रथम आवृत्ती, पृ.क्र.७१

२. ढगे एस.के.(जुलै २०१३), "भारतीय अर्थव्यवस्था : समस्या आणि भवितव्य", पुणे, के.एस. पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती, पृ. क्र. १२५

३. चव्हाण एन.एल. (२००९), "भारतीय अर्थव्यवस्था", जळगाव, प्रशांत पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती, पृ. क्र. ९२

४. ढगे एस.के. (जुलै २०१३), "भारतीय अर्थव्यवस्था समस्या आणि भवितव्य", पुणे, के. एस. पब्लिकेशन, पृ.क्र.८९

५. काळदाते सुधा (जून २००५), "भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या", औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स, प्रथम आवृत्ती, पृ.क्र.३५-३६

६. देसले किरण (फेब्रुवारी २०१३), "आर्थिक व सामाजिक विकास", जळगाव, दीपस्तंभ प्रकाशन, प्रथम आवृत्ती, पृ.क्र.२५

७. खटाळ बी. जी. (जून २०१६), "भारतातील आर्थिक विकास आणि नियोजन", सोलापूर, श्रद्धा पब्लिकेशन, प्रथमावृत्ती, पृ.क्र. ४२-४३

८. चव्हाण एन.एल. (२००९), "भारतीय अर्थव्यवस्था", जळगाव, प्रशांत पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती, पृ.क्र.६७

९. Loomba Dr. Suchi (२०१२), "Role of Micro Finance in Women Empowerment Development in India". Journal of International

१०. Report on "Small Change, Big Changes: Women and Microfinance", International Labour Office, Geneva, २०२१

११. Loomba Dr. Suchi (२०१२), "Role of Micro Finance in Women Empowerment in India", Journal of International Development.

१२. देशमुख रा. नी., "आपला नांदेड जिल्हा", नांदेड, कल्पना प्रकाशन, पृ.क्र. ११

१३. आगलावे प्रदीप (२००७), 'सामाजिक संशोधन पद्धती, नागपूर, साईनाथ प्रकाशन, प्रथम आवृत्ती, पृ. क्र. १६०-१६१

१४. बोधनकर सुधीर व इतर (२०१८), "सामाजिक संशोधन पद्धती, नागपूर, साईनाथ प्रकाशन, आठवी आवृत्ती, पृ. क्र. ६०-६१

१५. करे बिभीषण (जुलै २०१५), "सामाजिक संशोधनाची मूलतत्त्वे", औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स, प्रथम आवृत्ती, पृ. क्र. १३२)

१६. पाटील वा.भा. (१९९८), "संशोधन पद्धती", नागपूर, मंगेश प्रकाशन, पृ.क्र. १४१

१७.	कित्ता, पृ.क्र. १४८

१८.	आगलावे प्रदीप, (जानेवारी २०००), "संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर, विद्या प्रकाशन, पृ.क्र. ३६८

*** संशोधक ***
घंटेवाड आनंद तुकाराम
पीपल्स महाविद्यालय, नांदेड

*** मार्गदर्शक ***
प्रा. डॉ. कंधारे विश्वनाथ गोविंद
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
धुंडा महाराज कॉलेज, देगलूर